# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २४७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/०५/२०१८

**१) संगनमत करून विनापरवाना रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ११/०५/२०१८ चे २३.०० वाजता यातील आरोपी मालक व चालक यांनी संगनमत करुन आपल्या ताब्यातील टिप्पर मध्ये विना परवाना ४ ब्रॉस रेती कि. ८,०००/रु. ची. चोरीने घेवुन जातांना नागभीड निलज रोडवर घेवुन जातांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. रहांगडाले यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. ढाकने पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) गैरकायदयाची मंडळी जमवुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंदः–**

दिनांक ०७/०५/२०१८ चे २२.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी क्र. ४ यांचे कापड दुकान एकमेकांचे जवळ आहेत त्याच्या दमयंन्ती बागडे यांचे घराचे खरेदी वरून वाद आहे त्याच घराला नगर परीषद पवनी यांनी दि. १०/१०/२०१७ रोजी सिल केले असता यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी तयार करून नगर परषद पवनी यांनी वाद ग्रस्त घराला लावलेला ताला तोडला असता फिर्यादी यांनी आरोपीतांना हटकले तर आरोपी क्र. २ याने अश्लिल शिवीगाळ केली व आरोपी क्र. ३ याने सुध्दा अश्लिल शब्दात बोलुन आरोपीतांनी फिर्यादीस जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १४३,५०९,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**३) चारचाकी वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यु व दोन जखमी :–**

दिनांक ११/०५/२०१८ चे १६.०० ते १७.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन यातील मोटार सायकल क्रमांक एमएच ३६ एम ३७५३ ला तसेच २ सायकलला धडक मारून मोटार सायकल स्वार आणी सायकल स्वार यांना दुखापत करून यातील फिर्यादीचा मोठया वडीलांचा मुलगा सायकल स्वार गुरूचरण बिल्लोरे वय ५४ वर्ष, याचे मरणास कारणीभुत झाला व अपघताची खबर पोलीसांना न देता तसेच जखमींना औषधोपचार न देता घटना स्थळावरुन पळुन गेल्याने फिर्यादी देवराम वातु बिल्लोरे वय ३१ वर्ष रा. निलज बु. यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन करडी येथे कलम २७९, ३०४(अ) भादवी. सहकलम १८४,१३४ (अ)(ब) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. कोयंडे पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

**४) अत्याआवश्याक वस्तु अवैधरित्या वाहतुक करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १२/०५/२०१८ चे ०१.२० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे स्टॉपसह नाकाबंदी करीत असतांना यातील आरोपी हे एक लाल रंगाची चार चाकी जुनी वापरती गाडी क्र. एमएच ४० केआर ८५८८ कि. ५,००,०००/रु. व वाहनातुन अवैधरित्या ७० लिटर डिझेल किंमती ५,०००/–रु. चा माल वाहतुक करतांनी माल वाहतुक करतांना मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी. गेडाम यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३,७ अत्याआवश्यक वस्तु कायदा. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.नी.कदम पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १२/०५/२०१८ चे ०२.४२ वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे स्टॉप सह पेट्रोलींग करित असतांना नमुद घटना ता वेळी ठिकाणी एक इसम अंधाराचा फायदा घेवुन स्वत:चे अस्तीत्व लपवीत दखलपात्र अपराध करण्याचे बेतात असल्याचे संशय आल्यावरून मिळाल्याने त्यांने आपले नाव वैभव मुरलीधर मडावी रा. सुभाष भोजापुर भंडारा असे सांगीलल्याने त्यास ताब्यात घेवुन सरतर्फे फिर्यादी मपोउपनी. फटींग यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १२२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनी. फटींग पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**६) विष प्राशन केल्याने उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :—**

दिंनाक १०/०५/२०१८ चे २१.०० वाजता दरम्यान यातील मृतक तुळशिराम आडकुजी येनचिल्लवार वय ३५ वर्ष रा. सोनी याने विष प्राशन केल्याने त्याची प्रकृती बिघडल्याने औषधोपचाराकरीता ग्रामीन रूग्नालय लाखांदुर येथे प्रथमोपचार करुन पुढील उपचाराकरीता सामान्य रुग्नालय भंडार येथे भरती केले असता, उपचारादरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. चेटुले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**७) गळफास लावुन इसमाचा मृत्यु :—**

दिंनाक १२/०५/२०१८ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील मृतक सिंदप्रसाद चैनसिंग मसराम वय ४४ वर्ष, रा. एल/७–१५/१६ रेल्वे कॉर्टर देव्हाडी हा दारु पाणी पिण्याच्या सवयीचा असुन त्याची प्रकृती खराब राहत असल्याने प्रकृतीला कंटाळुन राहते घरी किचनमधील लाकडी लाकडाला ओढनीने गळफास लावुन आत्महत्या केल्याने मृतकची मुलगी कु. पुजा सिदप्रसाद मसराम वय १८ वर्ष, रा. एल/७–१५/१६ रेल्वे क्वॉर्टर देव्हाडी यांचे रिपोर्ट व डॉ. मेमो वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. उबाळे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**८) इसमाचे प्रेत मिळुन आले. :—**

दिंनाक १२/०५/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील मृतक रिजेन्द्र रामप्रसाद मेश्राम वय ३५ वर्ष, रा. साईटोला ता. खैरलांजी जि. बालाघाट हा मृत अवस्थेत काटे बाम्हणी शेत शिवार खापा ते रामटेक रोडचे बाजुला असलेल्या पिकलमुंडे यांच्या बांधी मध्ये मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. भुते यांचे चौकशी अहवाल व डॉक्टरी मेमो वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**९) नाकाबंदी दरम्यान दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ११/०५/२०१८ चे १९.४८ वाजता दरम्यान यातील आरोपी चालाकने त्याचे वाहनाने नागपुर नाका कडुन जि. प. चौ भंडारा कडे जात असतानां नाकाबंदी दरम्यान यातील आरोपी हा दारु पिवुन दारुचे नशेत आपल्या ताब्यातील वाहन चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे बिथ्रअल्कोहोल ॲनालायझर मशिन व्द्ारे श्वासाचा नमुना घेतला असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने व डॉ. परिक्षण अहवाला वरुन सरतर्फे फिर्यादी पोहवा. खान यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोहवा. गजभिये यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**१०) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १२/०५/२०१८ चे २३.०० वाजता दरम्यान यातील बिना नंबरची स्कारपियो वाहन चालक याने त्याचे ताब्यातील वाहन ताडेश्वर वार्ड पवनी येथे रोडाचे अगदी मध्ये लावुन येणाऱ्या –जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास अडथळा निर्माण करतांनी मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. ढाकने यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. ढाकने पोलीस स्टेशन पवनी करीत आहेत.

**११) अवैध हातभट्टी दारू/जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक १२/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, तुमसर व अडयाळ येथे अवैध हातभट्टी दारू/जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३० लिटर हातभंट्टी दारू किमती ३०००/–रु. ४ लिटर ३२० मिली लिटर देशी/विदेशी दारु किंमती २८००/–रु. तसेच जुगारातुन कि. १,७६,३९०/रु. असा एकुण किंमती १,८२,१९०/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१२) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १२/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण २०८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक– ०९ तीन सिटर वाहनाकरीता– ०१ ईतर वाहनांवरती – १९८ केसेस करण्यात आले आहे.

(विनी एस.आर.तेलुरे)
*जिवीशा भंडारा*
दुरध्वनी क्र.९९२१२५३५४९

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता